## परराज्यातील अवैध मद्य वाहतूकप्रकरणी कारवाई
# १ कोटी ७२ लाखाचा मुद्देमाल जप्त

**मुंबई, दि. ३० : प्रतिनिधी**



ठाणे जिल्ह्यातील मुंबई-नाशिक महामार्ग, सोनाळे गावच्या हद्दीत एच.पी पेट्रोल पंपाजवळ (ता. भिवंडी) परराज्यातील मद्याची वाहतूक करणाऱ्या वाहनावर 27 जानेवारी रोजी कारवाई करण्यात आली. या कारवाईत गोवा राज्यात निर्मित महाराष्ट्र राज्यात विक्रीस बंदी असलेल्या रॉयल ब्ल्यु माल्ट व्हिस्की ब्रॅण्ड मद्याचे 1400 बॉक्स अर्थात 180 मि.ली क्षमतेच्या 67 हजार 200 बाटल्या दारूबंदी कायद्यातंर्गत जप्त करण्यात आल्या. तसेच आयशर कंपनीच्या एमएच 04 एलवाय 4133 क्रमांक असलेल्या सहाचाकी वाहनासह, एक मोबाईल फोन असा एकूण 1 कोटी 72 लाख 94 हजार रूपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

या कारवाईत श्रवणकुमार कृष्णराम पंवार, रा. सगडवा, पो. डावल, ता. चीतलवाना, जि. जालोर (राजस्थान) यास अटक करण्यात आली आहे. राज्य उत्पादन शुल्कचे आयुक्त डॉ राजेश देशमुख, सहआयुक्त प्रसाद सुर्वे, कोकण विभागाचे विभागीय उपआयुक्त प्रदीप पवार, ठाणे यांच्या कारवाईच्या दिलेल्या निर्देशानुसार व दुय्यम निरीक्षक दिगंबर शेवाळे यांच्या मार्गदर्शनाखाली कारवाई करण्यात आली. कारवाईमध्ये दुय्यम निरीक्षक रिंकेश दांगट, दुय्यम निरीक्षक व्ही. व्ही. सकपाळ, दुय्यम निरीक्षक एच. बी यादव, सहायक दुय्यम निरीक्षक महावीर कोळेकर, तसेच जवान हुनमंत गाढवे, हर्षल खरबस, अमीत सानप, श्रीराम राठोड, कुणाल तडवी, सागर चौधरी यांचा सहभाग होता.

या गुन्ह्याचा पुढील तपास दुय्यम निरीक्षक रिंकेश दांगट करीत आहे, असे विभागीय भरारी पथकाचे दुय्यम निरीक्षक यांनी कळविले आहे.

# विमान अपघाताचा तपास वेळेत पूर्ण करू
## केंद्रीय विमान वाहतूक मंत्र्यांचे मुख्यमंत्री फडणवीस यांना आश्वासन

**मुंबई, दि. ३० : प्रतिनिधी**

बारामती येथे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विशेष विमानाला झालेल्या अपघाताचा तपास सुरू करण्यात आला आहे. अत्यंत पारदर्शी पद्धतीने या घटनेचा सखोल तपास पूर्ण केला जाईल, असे आश्वासन केंद्रीय हवाई वाहतूकमंत्री राममोहन नायडू यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दिले आहे. तसेच, फडणवीसांच्या सूचनेनुसार, भविष्यात असे अपघात टाळण्यासाठी आवश्यक उपाययोजना हाती घेण्याचा शब्दही केंद्रीय मंत्र्यांनी दिला आहे.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी गुरुवारी केंद्रीय हवाई वाहतूकमंत्री राममोहन नायडू यांना पत्र पाठवून बारामती विमान दुर्घटनेच्या सखोल तपासाची विनंती केली होती. बुधवारी अजित पवार मुंबईहून बारामतीकडे जात असताना



त्यांच्या विमानाचा भीषण अपघात झाला. या अपघातात अजित पवार यांच्यासह पाचजणांचा मृत्यू झाला. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या दुर्घटनेच्या कारणांची चौकशी व्हावी आणि भविष्यात अशा घटना टळाव्यात,

यासाठी तातडीची पावले उचलावीत, अशी मागणी करत केंद्रीय हवाई वाहतूकमंत्री नायडू यांना पत्र पाठवले. अजित पवार यांच्यासारख्या ज्येष्ठ नेत्यासह इतर पाचजणांचा मृत्यू हा अत्यंत गंभीर प्रकार असून, अपघात नेमका कशामुळे झाला, याचा सखोल तपास होणे आवश्यक असल्याचे फडणवीस यांनी पत्रात नमूद केले होते. फडणवीस यांच्या पत्राची तातडीने दखल घेत केंद्रीय मंत्र्यांनी तपास सुरू करण्यात आल्याचे कळविले.

बारामती येथील विमान अपघात आणि त्यात उपमुख्यमंत्री अजित पवारांसह पाचजणांच्या झालेल्या मृत्यूची केंद्र सरकारने गंभीर दखल घेतल्याचे केंद्रीय मंत्री नायडू यांनी आपल्या पत्रात नमूद केले आहे. या दुर्घटनेचा तपास सुरू करण्यात आला आहे. तसेच, भविष्यात अशा दुर्घटना होऊ नयेत, याद्दष्टीने राज्य सरकारच्या

सूचनेची केंद्रीय मंत्रालयाने गंभीर दखल घेतली असून, चौकशी अहवाल प्राप्त होताच आवश्यक उपाययोजना केल्या जातील. या प्रक्रियेत महाराष्ट्र सरकारचे सहकार्य महत्त्वाचे असून, स्थानिक प्रशासनाची मदतही अपेक्षित असल्याचे नायडू यांनी नमूद केले. संपूर्ण चौकशी अहवाल राज्य सरकारलाही सादर करण्यात येईल, असेही त्यांनी सांगितले.

# महाराष्ट्रातील आयटीआय होणार सर्वोत्तम 'स्किल डेव्हलमपेंट हब' -मंत्री मंगल प्रभात लोढा

**मुंबई, दि. ३० : प्रतिनिधी**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या शाश्वत विकासाच्या दूरदृष्टीच्या संकल्पनेतून आकाराला आलेल्या ' पीएम सेतू ' या योजनेमुळे महाराष्ट्रातील आयटीआय सर्वोत्तम 'स्किल डेव्हलमपेंट हब' होणार असल्याचे, राज्याचे कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी म्हटले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत पहिल्या टप्प्यात महाराष्ट्रातील चार जिल्ह्यात ही योजना सुरू करण्यास मान्यता देण्यात आली आहे. राज्यातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचे (आयटीआय) पीएम सेतू योजनेंतर्गत आधुनिकीकरण होणार असून पुढच्या टप्प्यात उर्वरित जिल्ह्यांचा समावेश करण्यात येणार आहे.

कुशल मनुष्यबळाची मागणी आणि पुरवठा यांच्यातील तफावत भरून काढण्यासाठी पीएम सेतू योजनेतून आयटीआयचे आधुनिकीकरण करण्याची योजना आहे. या योजनेच्या पहिल्या टप्पात नागपूर, छत्रपती संभाजी नगर आणि पुणे येथील आयटीआयचे आधुनिकीकरण केले जाणार आहे.

आयटीआयच्या आधुनिकीकरणासाठी हब अँड स्पोक प्रारूप विकसित केले जाणार आहे. या योजनेत केंद्र आणि राज्य सरकार मिळून २४२ कोटी खर्च करणार असून यामुळे राज्यातील आयटीआयचे रूप पालटणार आहे. या आधुनिकीकरणामुळे तरुणांना विविध क्षेत्रात दर्जेदार व्यावसायिक संधी उपलब्ध होणार आहे. या योजनेची पुढच्या वर्षात टप्प्या-टप्प्याने अंमलबजावणी करण्यासही मान्यता देण्यात आली. योजनेकरिता केंद्र सरकारचा ५० टक्के, राज्य सरकारचा ३३ टक्के आणि उद्योग क्षेत्राचा १७ टक्के निधी असेल. आयटीआयच्या आधुनिकीकरणासाठी वरील प्रमाणे निधी खर्च करण्यास मान्यता देण्यात आली. राज्यात एका क्लस्टरकरिता (१ हब आयटीआय व ४ स्पोक आयटीआय) पाच वर्षाकरीता अंदाजित २४१ कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. त्याकरिता केंद्र सरकारचे ११२ कोटी रुपये, राज्य शासनाचे ९८ कोटी रुपये आणि उद्योग क्षेत्राचा ३१ कोटी रुपयांचा वाटा असेल. त्यापैकी राज्य शासनाकडून पाच वर्षाकरिता करावयाच्या ९८ कोटी रुपयांच्या खर्चासही मान्यता देण्यात आली आहे.



नागपूर येथील गव्हर्न्मेंट आयटीआय, नागपूर आयटीआयचे हब म्हणून आधुनिकीकरण केले जाईल. मुलींसाठीचे आयटीआय, नागपूर, कामटी, हिंगणा आणि बुटीबोरी येथील आयटीआयचा समावेश आहे. छत्रपती संभाजी नगर येथील आयटीआय हब म्हणून आधुनिकीकरण करणार. त्याचबरोबर पैठण, खुल्ताबाद, गंगापूर आणि फुलंब्री येथील आयटीआयचेही आधुनिकीकरण केले जाणार आहे. पुण्यातील औंध येथील आयटीआयचा हब म्हणून आधुनिकीकरण केले जाणार. औंध येथील मुलींसाठीचे आयटीआय, खेड-राजगुरूनगर आणि मुळशी येथील आयटीआयचे आधुनिकीकरण करण्यात येणार आहे.

एका हब आयटीआयमध्ये सरासरी चार नवीन अभ्यासक्रम सुरू केले जाणार असून, दहा विद्यमान अभ्यासक्रमांची श्रेणी सुधारणा केली जाणार आहे. स्पोक आय़टीआयमध्ये दोन नवीन अभ्यासक्रम सुरू करण्यात येणार आहेत तर आठ अभ्यासक्रमांची श्रेणी सुधारणा केली जाणार आहे. उद्योगांची संख्या कमी असलेल्या ठिकाणी सेवा क्षेत्र, बहुकौशल्य अभ्यासक्रम आणि उपजिविका अभ्यासक्रम सुरू करण्यात येणार आहेत.

गुरुकुल परंपरा, नालंदासारखी विद्यापीठे आणि आर्यभट्टांसारखे विद्वान यांच्यामुळे भारत ज्ञानार्जनाचे जागतिक केंद्र म्हणून उदयास आले. आज त्या ज्ञानपरंपरेलाच अनुसरून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आधुनिक कौशल्य प्रशिक्षणाची जोड देत आयटीआयच्या माध्यमातून नवा भारत घडवण्याचा प्रयत्न करत असल्याचेही मंत्री लोढा यांनी स्पष्ट केले आहे.



## राष्ट्रपिता महात्मा गांधी यांना विधान भवनात आदरांजली


*राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या पुण्यतिथीनिमित्त विधान भवन येथे महाराष्ट्र विधिमंडळ सचिवालयाचे सचिव-1 जितेंद्र भोळे व सचिव-3 डॉ.विलास आठवले यांनी राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या प्रतिमेस पुष्पहार व गुलाबपुष्प अर्पण करुन आदरांजली वाहिली. तसेच, याप्रसंगी हुतात्मा दिनानिमित्त देशाच्या स्वातंत्र्यासाठी प्राणार्पण केलेल्या हुतात्म्यांना दोन मिनिटे मौन पाळून श्रद्धांजली वाहण्यात आली.*

*याप्रसंगी महाराष्ट्र विधिमंडळाचे सह सचिव नागनाथ थिटे, सह सचिव (समिती) राजेश तारवी, उप सचिव विजय कोमटवार, स्वाती ताडफळे, अवर सचिव सुरेश मोगल, उप सभापती यांचे खाजगी सचिव अविनाश रणखांब, संचालक, वि.स.पागे, संसदीय प्रशिक्षण केंद्र आणि जनसंपर्क अधिकारी, म.वि.स. निलेश मदाने यांच्यासह इतर अधिकारी व कर्मचारी यांनीही राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या प्रतिमेस गुलाबपुष्प अर्पण करुन आदरांजली वाहिली.*



*राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या पुण्यतिथीनिमित्त मंत्रालयाशेजारील उद्यानात महात्मा गांधींच्या पूर्णाकृती पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून श्रद्धांजलीही वाहण्यात आली. यावेळी आमदार अमीन पटेल, नगरसेवक ज्ञानराज नाईक, नगरसेविका राजेश्वरी पाटणकर, महात्मा गांधी स्मारक समितीचे महासचिव देवरा सिंग, सचिव सुमन पवार, प्रा. अमर सिंग यांच्यासह कुलाबा म्युनिसिपल सेकंडरी स्कूलचे विद्यार्थी, नागरिक उपस्थित होते.*

*यावेळी सर्वधर्मीय प्रार्थना झाली. मर्झबान वाडिया यांनी पारसी, ज्युलिस क्रेझर यांनी ख्रिश्चन, मौलाना मझरूल इस्लाम यांनी मुस्लिम, दीपक क्षीरसागर यांनी बौद्ध, सोहन सिंग यांनी शिख, केशव चंद्र प्रभू यांनी हिंदू तर भरत जैन यांनी जैन धर्माच्या प्रार्थनेचे वाचन केले.*



## दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांना विधान भवन येथे श्रध्दांजली

*राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांना विधान भवन येथे श्रध्दांजली अर्पण करण्यात आली. विधान भवन इमारतीतील मुख्यप्रवेशद्वाराजवळ त्यांच्या प्रतिमेस सर्व अधिकारी आणि कर्मचारी यांच्यातर्फे पुष्पहार आणि गुलाबपुष्प अर्पण करण्यात आले. सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून महाराष्ट्र राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांना श्रध्दांजली अर्पण केली.*

*याप्रसंगी महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाचे सचिव-1 जितेंद्र भोळे, सचिव-2 मेघना तळेकर इटकेलवार, सचिव-3 डॉ. विलास आठवले, सचिव-4 शिवदर्शन साठ्ये, सभापती महाराष्ट्र विधानपरिषद यांचे सचिव पंडित खेडकर, अध्यक्ष महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव सुनिल वाणी यांच्यासह सर्व अधिकारी आणि कर्मचारी वर्ग उपस्थित होता. राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती निधनाचे वृत्त समजताच विधानमंडळ सचिवालयातील अधिकारी आणि कर्मचारी वर्गात तीव्र दुःख आणि हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. अधिवेशन कामकाजाच्या निमित्ताने उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा वक्तशीरपणा तसेच शिस्तप्रियता स्पष्ट करणाऱ्या अनेक प्रसंगांना यावेळी उजाळा देण्यात आला.*

# विद्याविहार उड्डाणपुलाची सर्व कामे २५ जूनपर्यंत पूर्ण करा-अभिजीत बांगर





**मुंबई, दि. ३० : प्रतिनिधी**

मुंबई मनपाच्या 'एन' विभागाच्या हद्दीत पूर्व व पश्चिम यांना जोडणारा विद्याविहार रेल्वे स्थानकावरील उड्डाणपूल बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या वतीने उभारण्यात येत आहे. या प्रकल्पाचे संपूर्ण कामकाज दिनांक २५ जून २०२६ पर्यंत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. तथापि, पुलाच्या पूर्व बाजूकडील सर्व कामे दिनांक २८ फेब्रुवारी २०२६ पर्यंत पूर्ण केली जातील. पुलाच्या पश्चिम बाजूकडील बाधित निवासी व वाणिज्य बांधकामे हटविणे तसेच रस्तारेषा (Road alignment) नव्याने निश्चित करण्याची प्रक्रिया तातडीने पूर्ण करून उड्डाणपुलाच्या कामाला गती द्यावी. येणाऱ्या पावसाळ्याचा विचार करता, पुलाची सर्व आवश्यक कामे दिनांक ३१ मे २०२६ पूर्वी पूर्णत्वास नेण्याचे नियोजन करावे. त्यानंतर पृष्ठीकरण व अंतिम कामे पूर्ण करून हा पूल दिनांक २५ जून २०२६ पर्यंत वाहतुकीस खुला करण्याच्या उद्दिष्टाने प्रयत्न करावेत, असे स्पष्ट निर्देश अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (प्रकल्प) अभिजीत बांगर यांनी दिले आहेत.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या 'एन' विभागाच्या हद्दीत, घाटकोपर परिसरात पूर्वेकडील रामचंद्र चेंबूरकर मार्ग आणि पश्चिमेकडील लालबहादूर शास्त्री मार्ग यांना जोडण्यासाठी विद्याविहार रेल्वे स्थानकाच्या रुळांवरून जाणारा उड्डाणपूल महानगरपालिकेच्या पूल विभागाच्या वतीने उभारण्यात येत आहे. या उड्डाणपूल प्रकल्पामध्ये रेल्वे रुळांवरून जाणारा सुमारे १०० मीटर लांबीचा मुख्य पूल समाविष्ट आहे. अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (प्रकल्प) अभिजीत बांगर यांनी आज (दिनांक २९ जानेवारी २०२६) या प्रकल्पस्थळी भेट देऊन पाहणी केली. पाहणीदरम्यान त्यांनी संबंधित यंत्रणांना आवश्यक ते निर्देश दिले.

लालबहादूर शास्त्री मार्ग व रामचंद्र चेंबूरकर मार्ग यांना जोडणारा हा उड्डाणपूल एकूण दोन मार्गिकांचा आहे. एकूण ६५० मीटर लांबीच्या या प्रकल्पात रेल्वे रुळांवर १०० मीटर पूल, तर पूर्व बाजूस २२० मीटर आणि पश्चिम बाजूला ३३० मीटर पोहोच मार्ग बांधण्यात येत आहे. या उड्डाण पुलावरून विद्याविहार रेल्वे स्थानकाच्या पदपथांवर जाण्यासाठी जोडमार्ग देखील दिला जात आहे. त्यासोबतच दोन्ही बाजूचे रेल्वे तिकीट खिडकी कक्ष, स्थानक मास्तर कार्यालय, जीना यांची देखील पुनर्बांधणी केली आहे. रेल्वे हद्दीत जिन्याद्वारे पादचारी मार्ग उप-रस्त्याला जोडला जात आहे.

अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (प्रकल्प) अभिजीत बांगर यांनी सांगितले की, उड्डाणपुलाच्या पूर्व बाजूकडील कामे सध्या अंतिम टप्प्यात आहेत. पूर्व बाजूचा पोहोच मार्ग पूर्ण करणे तसेच पुलाच्या संपूर्ण भागाचे पृष्ठीकरण यासह सर्व कामे दिनांक २८ फेब्रुवारी २०२६ पर्यंत पूर्ण केली जातील. यासाठी कामकाजाचे सूक्ष्म व टप्पानिहाय नियोजन करावे. पश्चिम बाजूकडे आतापर्यंत सहा खांबांची उभारणी पूर्ण झाली आहे. तर उर्वरित चार खांबांची उभारणी, पुलाचा आडवा अंतरभाग (स्पॅन), पोहोच मार्ग आदी कामे प्रलंबित आहेत. ही कामे करताना वाहतूक वळविणे हे मोठे आव्हान आहे. त्यामुळे कामकाज सुरू असतानाच वाहतुकीसाठी अधिकाधिक जागा उपलब्ध होईल, या दृष्टीने पुलाच्या दोन्ही बाजूकडील रस्त्यांची कामे प्रथम पूर्ण करण्यात येतील. त्यानंतर पुलाच्या उर्वरित कामांमध्ये बाधित निवासी व वाणिज्य बांधकामे हटविणे तसेच रस्तारेषा नव्याने निश्चित करणे आदी बाबी पूर्ण केल्या जातील. या दोन प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर उड्डाणपुलाच्या कामांना लक्षणीय गती येईल. येत्या पावसाळ्याचा विचार करता, दिनांक ३१ मे २०२६ पर्यंत उड्डाणपुलाची सर्व प्रमुख आवश्यक कामे पूर्ण करावीत. त्यानंतर पृष्ठीकरण व इतर अंतिम कामे करावीत. कोणत्याही परिस्थितीत दिनांक २५ जून २०२६ पर्यंत उड्डाणपूल पूर्ण करून वाहतुकीस खुला करावा, असे स्पष्ट निर्देश अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (प्रकल्प) बांगर यांनी दिले आहेत. प्रमुख अभियंता (पूल) उत्तम श्रोते यांच्यासह संबंधित अधिकारी, अभियंते यावेळी उपस्थित होते.


**ANAND RATHI**

आनंद राठी ग्लोबल फायनान्स लिमिटेड, एक्सप्रेस झोन, ए विंग, ८ वा मजला, वेस्टर्न एक्सप्रेस हायवे, गोरेगाव (पूर्व), मुंबई – ४०० ०६३ भारत
**Phone:** +91 8433508283 | **Website:** www.rathi.com

**ई-लिलाव विक्री सूचना**

सर्वसाधारणपणे जनतेला आणि विशेषतः खालील कर्जदार/सह-कर्जदार/जामीनदारांना सूचना देण्यात येत आहे की आनंद राठी ग्लोबल फायनान्स लिमिटेड एआरजीएफएल (सुरक्षित कर्जदार) कडे सुरक्षित केलेली खाली वर्णन केलेली अनुसूची स्थावर मालमत्ता कर्ज खाते क्रमांक **APPL00018582 & APPL00019845** असून त्याचा भौतिक ताबा एआरजीएफएल च्या अधिकृत अधिकाऱ्याने वेबसाइट **https://sarfaesi.auctiontiger. net** द्वारे घेतला आहे, ऑनलाइन ई-लिलावाद्वारे अनुसूचीमध्ये विशेषतः नमूद केलेल्या तारखेला, जसे आहे तिथे आहे आणि जसे आहे जे आहे आणि जे काही आहे ते या आधारावर अनुसूचीमध्ये विशेषतः नमूद केलेल्या एकूण रकमेच्या वसूलीसाठी विकली जाईल आणि त्यावरील करारात्मक व्याज आणि इतर खर्च आणि शुल्क जोपर्यंत कर्जदार/सह-कर्जदार/जामीनदाराकडून वसुली झाल्याची तारीख खाली नमूद केल्याप्रमाणे:

| | |
|---|---|
| कर्जदाराचे नाव: (१) मेसर्स हायपरट्रॉन लॉजिस्टिक्स इंडिया प्रायव्हेट लिमिटेड (कर्जदार) युनिट क्रमांक ११० आणि १११, पहिला मजला, इमारत अ, स्लिव्हर स्प्रिंग, प्लॉट क्रमांक जी-६, कल्याण – पनवेल रोड, तळोजा एमआयडीसी, तळोजा, पनवेल जिल्हा रायगड-४२१ २०८, रायगड, महाराष्ट्र, भारत. | |
| सह-कर्जदाराचे नाव: (२) श्री. रवी रमेश यादव (सह-कर्जदार) युनिट क्रमांक ११०, पहिला मजला, इमारत अ, स्लिव्हर स्प्रिंग, प्लॉट क्रमांक जी-६, कल्याण – पनवेल रोड, तळोजा एमआयडीसी, तळोजा, पनवेल जिल्हा रायगड – ४२१ २०८, रायगड, महाराष्ट्र, भारत. (३) श्री. रमेश रामदुलार यादव (सह-कर्जदार) युनिट क्र. ११०, पहिला मजला, बिल्डिंग ए, स्लिव्हर स्प्रिंग, प्लॉट क्र. जी-६, कल्याण पनवेल रोड, तळोजा एमआयडीसी, तळोजा, पनवेल जि. रायगड – ४२१ २०८, रायगड, महाराष्ट्र, भारत. (४) कु. प्रियांका रवी यादव (सह-कर्जदार) युनिट क्र. ११०, पहिला मजला, बिल्डिंग ए, स्लिव्हर स्प्रिंग, प्लॉट क्रमांक जी-६, कल्याण-पनवेल रोड, तळोजा एमआयडीसी, तळोजा, पनवेल जि. रायगड-४२१ २०८, रायगड, महाराष्ट्र, भारत. | |
| मालमत्तेचा पत्ता: युनिट क्रमांक ११० आणि १११, पहिला मजला, इमारत अ, स्लिव्हर स्प्रिंग, प्लॉट क्रमांक जी-६, कल्याण पनवेल रोड, तळोजा एमआयडीसी, तळोजा, पनवेल जिल्हा रायगड – ४२१ २०८, रायगड, महाराष्ट्र, भारत | |
| थकलेली रक्कम (मागणी सूचनेनुसार, भविष्यातील व्याज आणि खर्चासह) | २,८८,७७,५१७/- (दोन कोटी अठ्ठ्याऐंशी लाख सत्यातर हजार पाचशे सतरा फक्त) |
| लिलावाची तारीख | ६ मार्च २०२६ |
| राखीव किंमत | रु. २,२१,१८,८५०/- (रुपये दोन कोटी एकवीस लाख अठरा हजार आठशे पन्नास फक्त) |
| कमाईची रक्कम ठेव | राखीव किमतीच्या १०% |
| किमान बोली वाढीची रक्कम | रु. २५,०००/- (रुपये पंचवीस हजार फक्त) |
| इच्छुक खरेदीदारांसाठी मालमत्तेच्या तपासणीची तारीख आणि वेळ | २७ फेब्रुवारी २०२६ सकाळी १० ते दुपारी ४ वाजेपर्यंत |
| केवायसी कागदपत्रांसह निविदा फॉर्म सादर करण्याची तारीख आणि वेळ / ईएमडीचा पुरावा इत्यादी. | २ मार्च २०२६ दुपारी ४.०० वाजेपर्यंत केवायसी कागदपत्रांसह |
| ऑनलाइन ऑफर उघडण्याची तारीख आणि वेळ | ६ मार्च २०२६ सकाळी १०:०० ते दुपारी १.०० वाजेपर्यंत |
| टीप: इच्छुक बोलीदार/खरेदीदार आनंद राठी ग्रुपची वेबसाइट **www.rathi.com** ला भेट देऊ शकतात लिलाव प्रक्रियेच्या अटी आणि शर्तींबद्दल तपशीलवार माहितीसाठी. | |

हे प्रकाशन नियम ८(६) आणि ९(१) किवा सुरक्षा व्याज (अंमलबजावणी) नियम, २००२ अंतर्गत वरील कर्जदार/सह-कर्जदार/जामीनदारांना ३० दिवसांची सूचना देखील आहे.

तारीख: ३० जानेवारी २०२६
ठिकाण: मुंबई

आनंद राठी ग्लोबल फायनान्स लिमिटेड
अधिकृत स्वाक्षरीकर्ता



**ANAND RATHI**

आनंद राठी ग्लोबल फायनान्स लिमिटेड, एक्सप्रेस झोन, ए विंग, ८ वा मजला, वेस्टर्न एक्सप्रेस हायवे, गोरेगाव (पूर्व), मुंबई – ४०० ०६३ भारत
**Phone:** +91 8433508283 | **Website:** www.rathi.com

**ई-लिलाव विक्री सूचना**

सर्वसाधारणपणे जनतेला आणि विशेषतः खालील कर्जदार/सह-कर्जदार/जामीनदारांना सूचना देण्यात येत आहे की आनंद राठी ग्लोबल फायनान्स लिमिटेड एआरजीएफएल (सुरक्षित कर्जदार) कडे सुरक्षित केलेली खाली वर्णन केलेली अनुसूची स्थावर मालमत्ता कर्ज खाते क्रमांक **APPL00018582 & APPL00019845** असून त्याचा भौतिक ताबा एआरजीएफएल च्या अधिकृत अधिकाऱ्याने वेबसाइट **https://sarfaesi.auctiontiger. net** द्वारे घेतला आहे, ऑनलाइन ई-लिलावाद्वारे अनुसूचीमध्ये विशेषतः नमूद केलेल्या तारखेला, जसे आहे तिथे आहे आणि जसे आहे जे आहे आणि जे काही आहे ते या आधारावर अनुसूचीमध्ये विशेषतः नमूद केलेल्या एकूण रकमेच्या वसूलीसाठी विकली जाईल आणि त्यावरील करारात्मक व्याज आणि इतर खर्च आणि शुल्क जोपर्यंत कर्जदार/सह-कर्जदार/जामीनदाराकडून वसुली झाल्याची तारीख खाली नमूद केल्याप्रमाणे:

| | |
|---|---|
| कर्जदाराचे नाव: (१) मेसर्स हायपरट्रॉन लॉजिस्टिक्स इंडिया प्रायव्हेट लिमिटेड (कर्जदार) युनिट क्रमांक ११० आणि १११, पहिला मजला, इमारत अ, स्लिव्हर स्प्रिंग, प्लॉट क्रमांक जी-६, कल्याण – पनवेल रोड, तळोजा एमआयडीसी, तळोजा, पनवेल जिल्हा रायगड-४२१ २०८, रायगड, महाराष्ट्र, भारत. | |
| सह-कर्जदाराचे नाव: (२) श्री. रवी रमेश यादव (सह-कर्जदार) युनिट क्रमांक ११०, पहिला मजला, इमारत अ, स्लिव्हर स्प्रिंग, प्लॉट क्रमांक जी-६, कल्याण – पनवेल रोड, तळोजा एमआयडीसी, तळोजा, पनवेल जिल्हा रायगड – ४२१ २०८, रायगड, महाराष्ट्र, भारत. (३) श्री. रमेश रामदुलार यादव (सह-कर्जदार) युनिट क्र. ११०, पहिला मजला, बिल्डिंग ए, स्लिव्हर स्प्रिंग, प्लॉट क्र. जी-६, कल्याण पनवेल रोड, तळोजा एमआयडीसी, तळोजा, पनवेल जि. रायगड – ४२१ २०८, रायगड, महाराष्ट्र, भारत. (४) कु. प्रियांका रवी यादव (सह-कर्जदार) युनिट क्र. ११०, पहिला मजला, बिल्डिंग ए, स्लिव्हर स्प्रिंग, प्लॉट क्रमांक जी-६, कल्याण-पनवेल रोड, तळोजा एमआयडीसी, तळोजा, पनवेल जि. रायगड-४२१ २०८, रायगड, महाराष्ट्र, भारत. | |
| मालमत्तेचा पत्ता: रोहाऊस नं. ५८-ए, ग्राउंड प्लस ३रा मजला, सेक्टर क्र. १३, रोडपाली, कळंबोली, नवीन पनवेल, जि. रायगड ४१० २०८, ठाणे, महाराष्ट्र, भारत | |
| थकलेली रक्कम (मागणी सूचनेनुसार, भविष्यातील व्याज आणि खर्चासह) | २,८८,७७,५१७/- (दोन कोटी अठ्ठ्याऐंशी लाख सत्यातर हजार पाचशे सतरा फक्त) |
| लिलावाची तारीख | ६ मार्च २०२६ |
| राखीव किंमत | १,८७,५५,८८०/- (एक कोटी सत्यांशी लाख पंचावन्न हजार आठशे ऐंशी फक्त) |
| कमाईची रक्कम ठेव | राखीव किमतीच्या १०% |
| किमान बोली वाढीची रक्कम | १०,०००/- (दहा हजार रुपये फक्त) |
| इच्छुक खरेदीदारांसाठी मालमत्तेच्या तपासणीची तारीख आणि वेळ | २७ फेब्रुवारी २०२६ सकाळी १० ते दुपारी ४ वाजेपर्यंत |
| केवायसी कागदपत्रांसह निविदा फॉर्म सादर करण्याची तारीख आणि वेळ / ईएमडीचा पुरावा इत्यादी. | २ मार्च २०२६ दुपारी ४.०० वाजेपर्यंत केवायसी कागदपत्रांसह |
| ऑनलाइन ऑफर उघडण्याची तारीख आणि वेळ | ६ मार्च २०२६ सकाळी १०:०० ते दुपारी १.०० वाजेपर्यंत |
| टीप: इच्छुक बोलीदार/खरेदीदार आनंद राठी ग्रुपची वेबसाइट **www.rathi.com** ला भेट देऊ शकतात लिलाव प्रक्रियेच्या अटी आणि शर्तींबद्दल तपशीलवार माहितीसाठी. | |

हे प्रकाशन नियम ८(६) आणि ९(१) किवा सुरक्षा व्याज (अंमलबजावणी) नियम, २००२ अंतर्गत वरील कर्जदार/सह-कर्जदार/जामीनदारांना ३० दिवसांची सूचना देखील आहे.

तारीख: ३० जानेवारी २०२६
ठिकाण: मुंबई

आनंद राठी ग्लोबल फायनान्स लिमिटेड
अधिकृत स्वाक्षरीकर्ता